सांगवी पोलीस स्टेशन,
पिंपरीचिंचवड आयुक्तालय
पत्ता - साई चौक, पी.डब्ल्यू.डी. ग्राऊंड समोर,
नवी सांगवी, पुणे. ४११०२७
दुरध्वनी/मोबाईल नंबर ८५३०३९७८३२
ईमेल -pssangvi.pcpc-mh@gov.in


जा.क्र. /२०२४ सांगवी पोलीस स्टेशनदिनांक ३०/०८/२०२४

## सांगवी पोलीस स्टेशनची कामगिरी
## आरोपीचे ताब्यातुन ०३ पिस्टल्स व ०३ जीवंत काडतुस जप्त केले.

दि. ३०/०८/२०२४ रोजी सांगवी पोलीस स्टेशनचे डी.बी. पथकाचे पो.हवा. विवेक गायकवाड यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दत्त आश्रम जवळील दापोडीकडे जाणाऱ्या नवीन पुलाच्या बांधकामाच्याखाली, जुनी सांगवी, पुणे येथे एक इसम त्याच्याकडील सॅक मध्ये देशी बनावटीचे पिस्टल विक्री करीता घेऊन आलेला आहे. सदरची माहिती मिळताच डि.बी. पथकाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक चक्रधर ताकभाते व स्टाफ हे तात्काळ घटनास्थळी गेले. त्यांनी सापळा रचुन त्या ठिकाणी असलेला इसम नामे आदित्य महेश डोंगरे, वय २४ वर्षे, रा. सर्वेनं. ७२, समर्थनगर, नवी सांगवी, पुणे यास ताब्यात घेतले. पोलीसांनी त्याचेकडे कसुन चौकशी केली व दोन पंचासमक्ष त्याच्याकडील सॅकची झडती घेतली असता, त्यामध्ये पोलीसांना ०३ देशी बनावटीचे पिस्टल्स व ०३ जीवंत काडतुस एकुण किंमत ७६,५००/- रु. असा मुद्देमाल मिळून आला. पोलीसांनी त्याच्याकडे त्याबाबत अधिक विचारपूस केली असता, त्याने त्याच्याकडे अग्निशस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचे सांगीतले. तसेच त्याने ते ०३ पिस्टल्स व ०३ जीवंत काडतुसे ही विक्रीकरीता आणल्याचे पोलीसांना सांगीतले.

पोलीसांनी कायदेशीर प्रक्रिया करुन ते ०३ पिस्टल्स व ०३ जीवंत काडतुसे जप्त केली. तसेच आदित्य महेश डोंगरे यास ताब्यात घेऊन त्याच्या विरुध्द सांगवी पोलीस स्टेशन येथे गु.नो.क्र. ३५४/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), ५(२५) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३), १३५ अन्वये गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक चक्रधर ताकभाते हे करीत आहेत. त्यांनी आरोपी आदित्य महेश डोंगरे नमूद गुन्हयात अटक केली.

गेल्या ०४ दिवसात सांगवी पोलीस स्टेशनच्या डि.बी. पथकाने एकुण ०४ पिस्टल्स व ०४ जीवंत काडतुसे जप्त करून उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त श्री.विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा.पोलीस उपआयुक्त, परिमंडळ १ श्रीमती स्वप्ना गोरे, मा. सहा.पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग श्री.सचिन हिरे यांचे मार्गदर्शनाखाली सांगवी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. महेश बनसोडे, पोलीस उपनिरीक्षक चक्रधर ताकभाते, सहा.पोलीस फौजदार शशिकांत वाघुले, पो.हवा.सचिन ढवळे, पो.हवा. विनोद साळवे, पो.हवा.विवेक गायकवाड, पो.हवा.विजय मोरे, पो.ना.प्रविण पाटील, पो.शि. सुहास डंगारे,पो.शि. प्रविण पाईकराव यांनी केली.